शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे-१
१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.comवेब साईट- WWW.dydepune.com

# इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७

## प्रसिध्दी निवेदन

**दिनांक २९.०७.२०१६.**

## पुण्यात पाचवी फेरी व विशेष फेरी एकत्र घ्या - मा. शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा आदेश

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी चे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत. या प्रवेश प्रक्रियेत ७३,३८५ जागांसाठी ७३,९६१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी फक्त १४२ विद्यार्थ्यांनाच त्यांचे पसंतीक्रम व कटऑफ न जुळल्यामुळे चौथ्या फेरी अखेर कॉलेज ॲलॉट होऊ शकले नाही.

केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती, पुणे यांनी मागणी केल्याप्रमाणे १ बेटरमेंट मिळाल्यामुळे तक्रार केलेले विद्यार्थी, दूर अंतरावरील कॉलेज मिळालेले विद्यार्थी व इतर काही कारणांमुळे मिळालेले कॉलेज बदलून मिळावे यासाठी तक्रारी करणा-या विद्यार्थी व पालकांच्या मागणीचा विचार करुन दिनांक २१.०७.२०१६ रोजी नवीन वेळापत्रक जाहिर करण्यात आले होते. तथापि, विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करुन निर्णय घेण्यासाठी व वेळापत्रकामध्ये काही अंशतः बदल करण्यासाठी तातडीची बैठक आज दि. २९.०७.२०१६ रोजी मा. मंत्री महोदयांनी मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा तसेच शिक्षण उपसंचालक पुणे व मुंबई, केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती सदस्य, पुणे व मुंबई यांच्या समवेत घेण्यात आली. या बैठकीमध्ये पुणे व मुंबई विभागातील प्रवेश प्रक्रियेतील विविध बाबीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. भौगोलिक भिन्नतेमुळे, वाहतूकींच्या सुविधांमधील भिन्नतेमुळे वेळापत्रकात काही बदल करणे आवश्यक होते. मा. विनोदजी तावडे, शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सुधारित वेळापत्रकास व कार्यपध्दतीस मान्यता दिली आहे.

ऑनलाईन प्रवेशाची पाचवी फेरी व विशेष फे-यांचे सुधारित वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | कार्यपध्दती | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पाचवी फेरी<br>अ) लांब अंतरावरील कॉलेज मिळालेले, बेटरमेंट घेवुन बाहेर पडलेले, प्रवेश रद्द केलेले, प्रवेश न घेतलेले, शाखा/माध्यम बदलणारे, पसंतीक्रम चुकीचा नोंद केलेले, व अन्य कोणत्याही कारणांसाठी कॉलेज बदल हवे असलेले व चौथ्या फेरी अखेर ॲलॉटमेंट न झालेले १४२ विद्यार्थी असे प्रवेश प्रक्रियेमध्ये सुरुवातीपासून सहभागी असणा-या विद्यार्थ्यांचा यात समावेश असेल. | या विद्यार्थ्यांनी जुन्या लॉग-इन मध्ये जावुन (पुर्वीचा ऑनलाईन फॉर्म नंबर) भाग-२ मधील फक्त पसंतीक्रम भरावेत. यामध्ये किमान ५ व कमाल १५ कॉलेजचे कोड नंबर (पसंतीक्रम) रिक्त जागांचा तपशील पाहुन भरावेत. (या विद्यार्थ्यांनी नवीन माहिती पुस्तिका घेऊ नये.) | दि. ३० जुलै २०१६ रोजी वेबसाईटवर प्रसिध्द होणा-या रिक्त जागांचा तपशिल पाहून पसंतीक्रम दि. १ व २ ऑगस्ट २०१६ रोजी भरावेत. |

| अ.क्र. | तपशिल | कार्यपध्दती | दिनांक |
|---|---|---|---|
| | पाचवी फेरी<br>ब) अद्याप अर्ज न केलेले, अर्ज अपूर्ण भरलेले विद्यार्थी सहभागी होतील. | अद्याप अर्ज न केलेल्या विद्यार्थ्यांनी नवीन माहिती पुस्तिका घेवुन त्यातील लॉग-इन आयडीचा वापर करुन माहिती पुस्तिकेतील सूचनेप्रमाणे भाग-१ व भाग-२ (ॲप्रुव्हलसह) पुर्ण करावेत. अपुर्ण अर्ज पुर्ण करण्यासाठी पुर्वीचाच लॉग-इन आयडी वापरावा. | दि.१ व २ ऑगस्ट २०१६ रोजी भाग-१ व भाग-२ पुर्ण करावेत. |
| | पाचव्या फेरीचे वेळापत्रक | | |
| | १. रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे. | दि. ३० जुलै २०१६ सायं. ५.०० वा. | |
| | २. वरील पाचवी फेरी अ व ब मधील सर्व विद्यार्थ्यांनी अर्ज भरणे | दि. १ व २ ऑगस्ट २०१६<br>(ॲप्रुव्हलची वेळ ११.०० ते ४.००) | |
| | ३. पाचवी फेरी अ मधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करणे. | दि. ४ ऑगस्ट २०१६ स.११.०० वा. | |
| | ४. पाचवी फेरी अ मधील विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | दि. ४ ऑगस्ट २०१६, स. ११ ते ५ वाजेपर्यंत<br>दि. ५ ऑगस्ट २०१६ स. ११ ते ५ वाजेपर्यंत | |
| | ५. पाचवी फेरी ब मधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करणे. | दि. ८ ऑगस्ट २०१६ स.११.०० वा. | |
| | ६. पाचवी फेरी ब मधील विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | दि. ८ ऑगस्ट २०१६ ,स. ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत<br>दि. ९ ऑगस्ट २०१६ स. १०.०० ते ३.०० वाजेपर्यंत | |
| २ | विशेष फेरी-१ | | |
| | १. रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे. | दि.१० ऑगस्ट २०१६ स. ११.०० वाजता | |
| | २. पसंतीक्रम (भाग-२) पुन्हा भरणे. | दि.१० ऑगस्ट २०१६ स. ११.०० ते दि. ११ ऑगस्ट सकाळी ९.०० वाजेपर्यंत | |
| | ३. गुणवत्ता यादी जाहीर करणे. | दि.१२ ऑगस्ट २०१६ दु.२.०० वा. | |
| | ४. गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | दि. १२ ऑगस्ट २०१६ दु.२.०० ते ५.०० वाजेपर्यंत<br>दि.१३ ऑगस्ट २०१६ स. १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत | |
| ३ | विशेष फेरी-२ | | |
| | १. रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे. | १६ ऑगस्ट २०१६ , सायं. ५.०० वा. | |
| | २. पसंतीक्रम (भाग-२) पुन्हा भरणे | १८ ऑगस्ट २०१६, स.११.०० ते दि.१९ ऑगस्ट सायं. ४.०० वाजेपर्यंत | |
| | ३. गुणवत्ता यादी जाहीर करणे. | २२ ऑगस्ट २०१६, स. ११.०० वा. | |
| | ४. गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | २२ व २३ ऑगस्ट २०१६,<br>स.११.०० ते ४.०० वाजेपर्यंत | |
| ड | विशेष फेरी-३ चा तपशील/ वेळापत्रक नंतर जाहीर केले जाईल. | | |

## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सुचना :-

१. यापुर्वी ऑनलाईन प्रवेश अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांनीच माहिती पुस्तिका व लॉग-इन आयडी घ्यावा. अशा विद्यार्थ्यांसाठी खालील महाविद्यालयात माहिती पुस्तिका व लॉग-इन आयडी उपलब्ध राहील. अन्य कोणत्याही विद्यार्थ्यांनी माहिती पुस्तिका घेण्याची आवश्यकता नाही.

१.एस एम जोशी कनिष्ठ महाविद्यालय,हडपसर पुणे

२.एच एस सी पी (हुजूरपागा) हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, लक्ष्मीरोड पुणे

३. श्री म्हाळसाकांत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आकुर्डी पुणे-३५

२. सदर विद्यार्थ्यांनी अर्जात आरक्षण नमुद केल्यास अर्जाचा भाग-१ खालील मार्गदर्शन केंद्रावरुन ॲप्रुव्ह करावा त्या शिवाय अर्जाचा भाग-२ भरता येणार नाही. अर्जाचा भाग-१ व भाग-२ पुर्ण करुन ऑनलाईन सबमिट करावा व त्याची प्रिंट घ्यावी. ॲप्रुव्हल साठी खालील प्रमाणे केंद्र आहेत.

१. साधना कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर पुणे

२. नुमवि कनिष्ठ महाविद्यालय, बाजीराव रोड पुणे-२

३. प्रेरणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सेक्टर नं-२७अ, निगडी प्राधिकरण, पुणे-४४

३. ज्या विद्यार्थ्यांनी लॉग-इन केलेले होते पण प्रवेश अर्ज अपुर्ण आहेत त्यांनी भाग-१ व भाग-२ वरील प्रमाणे पुर्ण करुन ऑनलाईन सबमिट करावा.

४. ज्या विद्यार्थ्यांना लांब अंतरावरील महाविद्यालय मिळाले आहे, पसंतीक्रम चुकला आहे, शाखा/माध्यम बदल, इत्यादी कारणांनी महाविद्यालय बदल हवा आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या पुर्वीच्या लॉग-इन आयडी वर लॉग-इन करुन भाग-२ (पसंतीक्रम) भरावा.

५. प्रवेश अर्जाचा भाग-२ म्हणजेच पसंतीक्रम भरताना http://pune.fyjc.org.in या बेवसाईटवर प्रसिध्द केलेला कॉलेज कोडनिहाय रिक्त जागांचा तपशील पाहुन एक शाखा व माध्यम निवडून किमान ५ व कमाल १५ पसंतीक्रम भरावते. पसंतीक्रम निवडतांना विद्यार्थ्यांने स्वत:चे गुण, रिक्त जागा व सोईचे महाविद्यालये यांचा विचार करुन योग्य क्रमाने कॉलेज कोड नंबर भरावेत. कॉलेज कोड नंबर टाकताना संबधित कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव, एरिया, शुल्क , माध्यम इत्यादी माहिती स्क्रिनवर दिसते, त्याची खात्री करुनच पसंतीक्रम भरावेत. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नव्याने २३ कनिष्ठ महाविद्यालये व नवीन १४ तुकडया ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट झालेल्या आहेत. या सर्व महाविद्यालयाच्या जागा सदर प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करुन घेतलेल्या आहेत. नवीन कनिष्ठ महाविद्यालयांचे कोड नंबर, शाखा, इत्यादी माहिती http://pune.fyjc.org.in या बेवसाईटच्या होमपेजवर दिसेल. ( नवीन महाविद्यालये विना अनुदानित आहेत).

६. विशेष फेरीतील प्रवेश रिक्त जागांवर होणार असल्याने विद्यार्थ्यांनी त्यांचा आधीचा प्रवेश रद्द करु नये. विशेष फेरीतील प्रवेश ॲलॉट झाल्यानंतर व तेथे प्रवेश घ्यावयाचा असल्यासच पुर्वीचा प्रवेश रद्द करावा. वेळापत्रकात दिलेल्या वेळेतच प्रवेश घ्यावेत, कोणत्याही परिस्थितीत प्रवेशाची वेळ वाढवुन दिली जाणार नाही.

७. वरील प्रत्येक फेरीमध्ये पसंतीक्रम नव्याने भरावयाचे आहेत, किमान ५ पसंतीक्रम भरल्यास अर्ज सिस्टीमध्ये स्विकारला जाईल. ज्या विद्यार्थ्यांना यापेक्षा अधिक पसंतीक्रम द्यावयाचे असतील तर ते कमाल १५ पसंतीक्रम देवु शकतात.

८. वरील वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश देतांना सर्व प्रवेश दिलेल्या वेळेतच ऑनलाईन अपडेट करणेची सर्वस्वी जबाबदारी संबधित महाविद्यालयाची राहील, त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. प्रवेश देतेवेळी इंटरनेट, पर्यायी विद्युत पुरवठा (जनरेटर) व इतर आवश्यक सोईसुविधा महाविद्यालयात उपलब्ध असाव्यात.

९. वरील वेळापत्रकाप्रमाणे अंतिम प्रवेश घेतांना सदर प्रक्रिया शुल्क (प्रोसेसिंग फी) रु. ५०/-(पन्नास फक्त) महाविद्यालयात जमा करावे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१